MHRT050006012024

**नियमित दिवाणी दावा क्र. ६७/२०२४**

**सखाराम भिवा कदम वै.४**

**वि.**

**अर्जुन रामजी कदम वै.८**

## तुर्तातूर्त ताकिदीचे अर्ज नि. क्र. ५४ व नि. क्र. ६५ वरील एकत्रित आदेश

**०१.** मूळ वादी यांनी मूळ प्रतिवादी क्र. १ ते ८ यांचे विरुध्द सन २०२६ शिमगा महोत्सव पूर्वपरंपरेने साजरा करण्यास हरकत अडथळा करू नये अशी तुर्तातूर्त ताकिद मिळणेकरीता अर्ज नि. क्र. ५४ दाखल केला आहे. याउलट मूळ प्रतिवादी क्र. ६ व ८ यांनी देखील शिमगा सणाला पालखीचे व शिमगा सणातील त्यांना असलेले पारंपारिक हक्क बजावण्यास मूळ वादी यांनी हरकत अडथळा करू नये अशी तुर्तातूर्त ताकिद मिळणेकरीता अर्ज नि. क्र. ६५ दाखल केला आहे.

**०२.** दोन्ही अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले.

**०३.** मूळ वादीचे विद्वान वकील श्री. एस. जी. चिकणे व मूळ प्रतिवादी यांचे विद्वान वकील श्री. एम. एन. जाडकर यांचा युक्तिवाद ऐकला.

**०४.** मूळ वादी यांनी नि. ५४ वरील अर्जामध्ये सादर केले की, मौजे चाटव, ता. खेड, जि. रत्नागिरी येथे श्रीदेवी नवलाई व वाघजाई देवींचे मंदिर हे जुने पुरातन म्हणजेच १८७४ पूर्वीपासून अस्तित्वात आहे. सदरचे मंदिराचे श्रीदेवी वाघजाई देवस्थान नावाने मुंबई सार्वजनिक न्यास अधिनियमाअंतर्गत नोंदणी केलेली असून देवदेवतांचे सणासुदीला व वादविषयक सणांना देवांचे कार्यक्रमातील मान पूर्वपरंपरागत ठरवून देण्यात आलेले आहे. सदरचे मान हे दिवाणी हक्क आहेत. देवी वाघजाई नवलाईचे मूळ चार घराण्यांचा मान आहे. त्या चार घराण्यामध्ये मानू दाजी कदम, हरी बाबाजी कदम, बाळ गंगाजी कदम व अंबाजी मानाजी कदम येतात. सदर

मान या चार घराण्यांचे प्रतिनिधींमार्फत केले जातात. सन १९२७ चे सुमारास या चार घराण्यांचे प्रतिनिधींनी गावातील पंचांसमक्ष संपूर्ण गावासमोर मानपानाचे दस्तपत्र तयार केले. हे मान पुढे चालूच होते. ज्याच्या त्याच्या कुटुंबातील एक व्यक्ती प्रतिनिधीत्व स्वरुपात त्याचे घराण्याचे वतीने मान बजावत असत व आहेत. सन २००३ मध्ये देवासमोरील घाटधुपारत कोणत्या पालखीसोबत घ्यायची यावरून वाद झाल्याने कदम भावकीने मोरे लोकांविरुध्द रेमुनं. ३७/२०१३ हा दावा दाखल केला. सदर दाव्यातील पक्षकारांमध्ये तडजोड होऊन शिमगा सणात मंदिरातील घाटधुपारत ही मोरे लोकांनी त्यांचे पालखी सोबत नेण्याचे मान्य केले. सदर दाव्यामध्ये वादी म्हणून याच दाव्यातील वादी क्र.२ व प्रतिवादी क्र.५ पक्षकार होते. दाव्यामध्ये वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान दि. ०७.०३.२००६ रोजीचे मानपत्राबाबत उल्लेख करण्यात आला आहे. सदर दस्तामध्ये जरी मान हे वैयक्तिक नाव लिहून नमूद केले असले तरी पूर्वापार कागदी पाहता त्या भावकीचा मान आहे तो त्या मूळ पुरुष यांच्या वंशावळीतील वारसांच्या वतीने प्रतिनिधीत्व स्वरुपात नमूद करण्यात आला आहे. रेमुनं. ०१/२००३ चे कामी देखील धुपारतीवरून तडजोड करण्यात आली. सदरचे मान हे मूळ चार मानकरी कुटुंबातील वंशज आपापसातील संमतीने कुटातील वंशजाच्या कोणत्या घरात मान बजावून घ्यायचा ते आपसंमतीने ठरवतात. आजतागायत दि.०७.०३.२००६ चे मानपत्रानुसारच मानपान बजावले जातात. सन १९७३ मध्ये ठराव होऊन देखील १९९९ नंतर गणपत गोविंद कदम व पर्शुराम विठ्ठल कदम यांचे मानपानावरून वादविवाद होऊ लागले. गेली अनेक वर्षे प्रत्येक सणापूर्वी पोलीस स्थानक व कार्यकारी दंडाधिकारी यांचे पर्यंत वाद जात असे. या गोष्टीचा राग मनात धरून मूळ प्रतिवादी क्र. १ ते ६ यांनी संगनमत करून व ग्रामस्थांना अंधारात ठेवून दि.०१.०४.२०२४ रोजी सत्यप्रतिज्ञापत्र नामक कागद तयार करून नोटरी केला व त्या कागदपत्रावर मूळ प्रतिवादी क्र.७ व ८ यांनी

साक्षीदार म्हणून सहया केल्या आहेत. तो दस्त बेकायदा व चुकीचा असून वादींवर बंधनकारक नाही. अशा दस्तामुळे गावामध्ये पारंपारिक सण व मानपान यामध्ये गैरसमजूत होऊन वाद होण्याची शक्यता आहे म्हणून हा दावा दाखल करणे भाग पडले आहे. दि. ०१.०३.२०२६ रोजीपासून गावाचा शिमगा सुरू होत असल्याने मूळ प्रतिवादी यांनी दि. ०१.०४.२०२४ रोजीचे दस्ताचा वापर करून हरकत केल्यास मूळ वादींचे अपरिमित असे न भरून येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे सदरचा अर्ज देणे भाग पडले आहे. मूळ प्रतिवादी हे याच दाव्यातील नि.१९ चे आदेशाप्रमाणे वागत नसल्याने सदरहू कारण घडले आहे. त्यामुळे सन २०२६ शिमगा महोत्सव मूळ वादी यांनी पूर्व परंपरेप्रमाणे साजरा करण्यास मूळ प्रतिवादी यांनी हरकत अडथळा करू नये अशी तुर्तातूर्त ताकिद देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

**०५.** मूळ प्रतिवादी क्र.१, २, ३, ५, ६ व ७ यांनी नि.५६ वर आपले म्हणणे सादर केले असून मूळ प्रतिवादी क्र.६ व ८ यांनी नि.६३ येथे कैफियत व प्रतिदावा सादर केलेला आहे. सदर नि.६३ मध्ये मूळ वादी यांचा तुर्तातूर्त ताकिदीचा अर्ज खोटा, खोडसाळ असल्याचे व मान्य नसल्याचे कथन केले आहे. सदर मूळ प्रतिवादी यांचे कथनानुसार ते त्यांच्या पूर्वजांपासून असलेले मान जे दि.०१.०४.२०२४ च्या प्रतिज्ञापत्रात नमूद केले आहे त्याप्रमाणे यापूर्वीही बजावत आले आहेत. मूळ वादी म्हणतात त्याप्रमाणे दि. ०७.०६.२००६ च्या प्रतिज्ञापत्राप्रमाणे सण साजरा करण्याबाबत आदेश करण्यात आला नाही. सन २०१४ नंतर कोणत्याही प्रकारे परंपरेप्रमाणे शिमगा सण साजरा करण्यात आला नाही. सन २०२४ चा शिमगा सण संपल्यानंतर नेहमी होत असलेला वाद व संभ्रम दूर करण्यासाठी ग्रामस्थ, मानकरी, पोलीस पाटील व भक्तगण यांचेमध्ये बैठक झाली होती तसेच दि.३१.०३.२०२४ रोजी मंदिरात झालेल्या बैठकीला ग्रामस्थ, पोलीस, वादी व प्रतिवादी उपस्थित होते. त्यावेळी श्रीदेवी वाघजाई समोर कौल घेण्यात

आला. कौल मिळाल्यानंतर शिमगा सण कसा साजरा करायचा याबाबत चर्चा झाली. त्यानुसार दि.०१.०४.२०२४ रोजीचे प्रतिज्ञापत्र करण्यात आले. सदर प्रतिज्ञापत्र तयार करताना वादी सोबत होते. त्यामुळे ते प्रतिज्ञापत्र सर्वांना बंधनकारक असून भविष्यात त्याचप्रमाणे शिमगा सण साजरा करायचे ठरले आहे. मूळ वादी यांनी दाव्यात मागणी केल्याप्रमाणे प्रतिज्ञापत्र रद्द करण्याची कायद्यामध्ये तरतूद नाही. दि.०१.०४.२०२४ चे प्रतिज्ञापत्र रद्द करता येणार नाही. रेमुनं.१३/२०१७ मध्ये कोर्टाने नमूद केले आहे की दि.०७.०३.२००६ रोजीचे शपथपत्र हा काही डॉक्युमेंट होत नाही त्यामुळे वादीला अशा प्रकारचे शपथपत्र रद्द करण्याचा अधिकार नाही. म्हणजेच सदर दावा विषयक दि.०१.०४.२०२४ चे प्रतिज्ञापत्र देखील बेकायदेशीर आहे असे वादीला म्हणता येणार नाही. मूळ वादी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांमध्ये वादी यांचे पूर्वज देवस्थानचे मानकरी असल्याबाबत कोणताही उल्लेख नाही. मूळ वादी यांनी सन २०२५ चा शिमगा सणाला कोणत्याही प्रकारे मानपान बजावलेला नाही व शिमगा सण साजरा करण्याचा प्रयत्न केला नाही. प्रतिवादी यांनी वादी यांना कुठल्याही सणाला पूजा अर्चा करण्यास हरकत केलेली नाही. प्रतिवादी यांनी नि.१९ वरील आदेशाचा भंग केला नाही. याउलट वादी यांनीच शिमगा सणात सहभागी न होऊन नि.१९ वरील आदेशाचा भंग केला आहे. अशा प्रकारे मूळ प्रतिवादी क्र.६ व ८ यांनी आपले म्हणणे दाखल करून मूळ वादीचे अर्जास विरोध दर्शविला आहे.

०६. मूळ प्रतिवादी ६ व ८ यांनी तुर्तातूर्त ताकिदीचा अर्ज नि.६५ मध्ये सादर केले की, प्रतिवादी हे मौजे चाटव, ता. खेड, जि. रत्नागिरी येथील श्री. वाघजाई मंदिरातील मानकरी आहेत. ते त्यांच्या पूर्वजांपासून या देवस्थानमध्ये असलेले विविध मान जे दि.०१.०४.२०२४ च्या प्रतिज्ञापत्रात नमूद केले आहेत त्याप्रमाणे यापूर्वीही बजावत आले आहेत. वादी हे देवस्थानच्या शिमगा उत्सवामध्ये

वेळोवेळी अडथळा निर्माण करतात. त्याचाच भाग म्हणून खोटा व खोडसाळ दावा दाखल केला आहे. दावा दाखल करून प्रकरण कोर्टात प्रलंबित ठेवून शिमगा सण साजरा होऊ नये तसेच अन्य मानक–यांना त्यांचा पूजेचा हक्क बजावता येऊ नये म्हणून वादी यांनी अडथळा करण्यासाठी प्रस्तुतचा दावा आणला आहे. वादी यांनी प्रतिदावा दाखल केला असून तो निकाली होण्यास बराच कालावधी जाणार आहे. दरम्यानचे काळात वादी हे प्रतिवादी यांना पारंपारिक पूजेचा हक्क बजावण्यास हरकत व अडथळा करतील अशी भिती प्रतिवादींना वाटत आहे. सन २०२५ मध्ये वादी यांनी खोटा व खोडसाळ तुर्तातूर्त ताकिदीचा अर्ज देऊन कोर्टाची दिशाभूल करून प्रतिवादी विरुध्द ताकिद आदेश मिळवला. आदेश मिळवूनही वादी हे शिमगा सणात सामील झाले नाहीत. त्यामुळे न्यायाचा तराजू प्रतिवादी यांच्या बाजूने आहे. वादी यांनी प्रतिवादी यांच्या पारंपारिक हक्क बजावण्यास अडथळा केल्यास त्यांचे न भरून येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे वादी यांचे विरुध्द दाव्याचा व प्रतिदाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत प्रतिवादी यांचे शिमगा सणातील पारंपारिक हक्क बजावण्यास हरकत अडथळा करू नये अशी तुर्तातूर्त ताकिद मिळावी अशी विनंती केली आहे.

**०७.** दोन्ही बाजूंची परस्पर विरोधी कथने लक्षात घेता माझ्या विचारार्थ खालीलप्रमाणे मुद्दे निघतात. त्यावरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | मूळ वादी प्रथमदर्शनी केस सिध्द करतात काय? | **होय.** |
| २. | सोयीस्करतेची तुला मूळ वादीचे बाजूने आहे असे मूळ वादी सिध्द करतात काय? | **होय.** |
| ३. | मूळ वादी ने मागणी केल्याप्रमाणे तुर्तातुर्त मनाई न | |

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| | दिल्यास मूळ वादीचे अपरिमित व कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे असे मूळ वादी सिध्द करतात काय? | **होय.** |
| ४. | मूळ प्रतिवादी क्र.६ व ८ प्रथमदर्शनी केस सिध्द करतात काय? | **नाही.** |
| ५. | सोयीस्करतेची तुला मूळ प्रतिवादी क्र.६ व ८ यांचे बाजूने आहे असे मूळ प्रतिवादी क्र.६ व ८ सिध्द करतात काय? | **नाही.** |
| ६. | मूळ प्रतिवादी क्र.६ व ८ यांनी मागणी केल्याप्रमाणे तुर्तातुर्त मनाई न दिल्यास त्यांचे अपरिमित व कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे असे मूळ प्रतिवादी क्र.६ व ८ सिध्द करतात काय? | **नाही.** |
| ७. | काय आदेश? | **अर्ज नि.५४ मंजूर व अर्ज नि.६५ नामंजूर केला.** |

## कागदोपत्री पुरावा

**०८.** मूळ वादी यांनी त्यांचे कथनांचे पृष्ठ्यर्थ याकामी यादी नि.५ येथे सन १९२७ मधील मानपानाच्या दस्ताची प्रत, दि.०७.१०.१९२७ रोजीचे कबुली पत्राची प्रत, दि.०६.०३.२००६ रोजीच्या प्रतिज्ञापत्राची प्रत, दि.०१.०४.२०२४ रोजीचे नोटरी केलेले सत्यप्रतिज्ञापत्राची प्रत, यादी नि.२२ येथे नियमित दिवाणी दावा क्र.१३/२००७ च्या न्यायनिर्णयाची प्रत, यादी नि.३९ येथे कार्यकारी दंडाधिकारी, खेड यांच्याकडील फौजदारी दंड संहिता, कलम १४४ अन्वये दावा क्र.०१/२०२५

च्या पत्राची प्रत, कार्यकारी दंडाधिकारी, खेड यांचेकडील फौजदारी/कावि.२/शिमगा उत्सव चाटव/२०२४ मधील आदेशाची प्रत, तसेच यादी नि.६२ वर दि.किर.अर्ज २८/२०२५ च्या अर्जाची प्रत अशी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

०९. मूळ प्रतिवादी यांनी यादी नि.३७ येथे त्यांच्या म्हणण्याच्या पृष्ठ्यर्थ कार्यकारी दंडाधिकारी, खेड यांच्याकडील फौजदारी दंड संहिता, कलम १४४ अन्वये दावा क्र.०१/२०२५ च्या पत्राची प्रत, कार्यकारी दंडाधिकारी, खेड यांचेकडील फौजदारी/कावि.२/शिमगा उत्सव चाटव/२०२४ मधील आदेशाची प्रत अशी कागदपत्रे दाखल केली आहेत.

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ व ४ करिता–**

१०. प्रस्तुतचे मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याने पुनरावृत्ती टाळण्याकरीता ते सर्व मुद्दे मी ते एकत्रित विचारात घेत आहे.

११. सदर प्रकरणात मूळ प्रतिवादी यांचे मुख्य कथन असे आहे की, मूळ वादी यांनी दि.०१.०४.२०२४ रोजीचा सत्यप्रतिज्ञापत्र असा टायटल असलेला नोटरी दस्त मूळ वादींवर बंधनकारक नाही असे घोषित करून मिळणेकरीता केलेला दावा कायदेशीर नाही. त्यांचे असे म्हणणे आहे की, दि.०१.०४.२०२४ रोजीचे नोटरी सत्यप्रतिज्ञापत्र हा डॉक्युमेंट होऊ शकत नाही. त्यामुळे तो रद्द करण्यासाठी घोषित करण्याचा दावा करता येणार नाही. परंतु याबाबत मूळ प्रतिवादी यांनी कोणताही केस कायदा किंवा कायद्यातील तरतूद दाखवून दिलेली नाही. रेमुनं.१३/२००७ मध्ये या न्यायालयाने दि.२५.०२.२०१० रोजी दिलेल्या निकालात दि.०७.०३.२००६ रोजीचे प्रतिज्ञापत्र रद्द करण्याचे कायद्यामध्ये कुठेही तरतूद नाही व हा काही डॉक्युमेंट

होत नाही असे नमूद करून ते प्रतिज्ञापत्र बेकायदेशीर असल्याचे जाहिर करून मिळण्याचा दावा रद्द केलेला आहे. परंतू सदर निकालातील कथने प्रस्तुतचा अर्ज निकाला काढताना बंधनकारक आहेत ही बाब मूळ प्रतिवादी यांनी या न्यायालयास पटवून दिलेली नाही. त्यामुळे मूळ वादी यांना त्यांनी दि.०१.०४.२०२४ चे सत्यप्रतिज्ञापत्र बंधनकारक नसलेचे घोषित करून मिळणेकरीता केलेला दावा हा बेकायदेशीर आहे असे सद्यस्थितीत म्हणता येणार नाही. याबाबत माझे असे मत आहे की, नोटरीकृत प्रतिज्ञापत्राला विविध कारणांवर आव्हान दिले जाऊ शकते.

**१२.** सदर प्रकरणाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मूळ वादी यांनी सन २०२५ चा शिमगा उत्सव पूर्व परंपरेने साजरा करण्यास मूळ प्रतिवादी क्र.१, २, ३, ५, ६, ७ यांनी हरकत अडथळा करू नये अशी तुर्तातूर्त ताकिद मिळणेकरीता नि.१९ वर अर्ज सादर केला होता. सदरचा अर्ज नि.१९ हा दि.१३.०३.२०२५ रोजी मंजूर करण्यात आला होता. सदर आदेशान्वये मूळ प्रतिवादी क्र.१ ते ३ व ५ ते ७ यांनी मूळ वादी यांना सन २०२५ चा शिमगोत्सव साजरा करण्याकरीता कोणतीही हरकत अडथळा करू नये असा तुर्तातूर्त मनाई आदेश देण्यात आला होता. मूळ प्रतिवादी यांनी सदर नि.१९ वरील आदेश कुठेही आव्हानीत केल्याचे दिसून येत नाही. त्याबाबत त्यांनी आपले लेखी म्हणणे व प्रतिदाव्यात देखील नमूद केले नाही. याउलट मूळ प्रतिवादी यांचे असे म्हणणे आहे की, मूळ वादी यांनीच सन २०२५ च्या शिमगोत्सवात हजर न राहून सदर नि.१९ वरील आदेशाचा भंग केला आहे. याठिकाणी नमूद करावेसे वाटते की, मूळ वादी यांनी या न्यायालयात मूळ प्रतिवादी यांनी नि.१९ वरील आदेशाचा भंग करून अवमान केलेबाबत कारवाई करणेसाठी दि.किर.अर्ज२८/२०२५ हा दि.२३.०४.२०२५ रोजी दाखल केल्याचे दिसून येते. त्याची प्रमाणित प्रत यादी नि.६२ सोबत दाखल केली आहे. त्यामुळे सदर नि.१९ वरील आदेश हा वादींनीच भंग केला आहे असे

म्हणणे चुकीचे ठरते. मागील वर्षीचे शिमगोत्सवाबाबत नि.१९ वरील मूळ प्रतिवादी यांचे विरुध्द दिलेला तुर्तातूर्त मनाई हुकूमाचा आदेश हा मूळ प्रतिवादी यांनी आव्हानीत न केल्यामुळे व मूळ वादी यांचे म्हणण्यानुसार मूळ प्रतिवादींनी सदर आदेशाचा भंग केला असल्यामुळे वेगळा दिवाणी किरकोळ अर्ज दाखल करण्यात आला आहे. प्रथमदर्शनी असे दिसून येते की, नि.१९ वरील तुर्तातूर्त ताकिदीचा आदेश हा शिमगोत्सव सन २०२५ करीता मर्यादित असल्याने व सन २०२६ चा शिमगोत्सव लवकर सुरू होत असल्याने मूळ वादी यांना परंपरेप्रमाणे हक्क बजावण्यास प्रतिवादी हरकत अडथळा करण्याची शक्यता नाकारता येत नाही ही वादीची भिती आहे. मूळ प्रतिवादी यांनी सदर नि.१९ वरील आदेशाचा भंग केला किंवा कसे, तसेच मूळ वादीचा प्रस्तुतचा दावा, मूळ प्रतिवादी क्र.६ व ८ यांचा प्रतिदावा गुणवत्तेवर निकाली होण्यास बराच कालावधी लागू शकतो. तोपर्यंत मूळ वादी यांच्या बाजून व मूळ प्रतिवादी यांच्या विरूध्द नि.१९ वरील पारीत केलेल्या तुर्तातूर्त ताकिदीच्या आदेशाप्रमाणे आदेश या अर्जावर पारित करणे मला योग्य व न्यायोचित वाटते. त्याचे दुसरे कारण असेही आहे की, नि.१९ वरील आदेश मूळ प्रतिवादी यांना मान्य नसता तर त्यांनी तो आदेश मा. अपिलीय न्यायालयात आव्हानीत केला असता. परंतू त्यांनी तो आदेश आव्हानीत देखील केला नाही व प्रतिवादी हे सदर आदेशाप्रमाणे वागले नाही त्यामुळे मूळ वादी यांनी वेगळा दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केलेला आहे. वरील विवेचनावरून मला असे वाटते की, प्रथमदर्शनी केस ही मूळ वादीच्या बाजूने आहे. मूळ प्रतिवादी क्र.६ व ८ यांनी सदर दाव्यात खूप उशिराने म्हणजेच दि.२१.०२.२०२६ रोजी लेखी म्हणणे व प्रतिदावा दाखल केलेला आहे. मूळ वादी यांनी जो दस्त त्यांच्यावर बंधनकारक नाही हे ठरवून मिळणेकरीता दावा दाखल केलेला आहे त्याच दस्ताच्या आधारे मूळ वादी यांनी मूळ प्रतिवादी यांना त्यांचे पारंपारिक हक्क बजावण्यास हरकत अडथळा करू नये याकरीता प्रतिदावा दाखल

केला आहे. वर नमूद केल्याप्रमाणे नि.१९ वरील आदेशाप्रमाणे मागील वर्षीच्या शिमगोत्सवाला ज्याप्रमाणे तुर्तातूर्त आदेश पारित करण्यात आला होता व तो आदेश आव्हानीत केलेल्या नसल्यामुळे त्याच आदेशाप्रमाणे या वर्षीच्या देखील शिमगोत्सवाला त्याचप्रमाणे आदेश करण्याकरीता वादीच्या बाजूने प्रथमदर्शनी केस आहे व प्रतिवादीच्या बाजूने प्रथमदर्शनी केस नसल्याचे दिसून येते. सबब, मी मुद्दा क्र. १ करीता होकारार्थी व मुद्दा क्र.४ करीता नकारार्थी निष्कर्ष नोंदवत आहे.

**मुद्दा क्र. २ व ५ करिता–**

**१३.** मुद्दा क्र.१ चे होकारार्थी निष्कर्ष व मुद्दा क्र.४ चे नकारार्थी निष्कर्ष विचारात घेता सोयीचा समतोल हो मूळ वादीचे बाजूने असल्याचे स्पष्ट होते. मूळ वादी यांनी दि.०१.०४.२०२४ चे सत्यप्रतिज्ञापत्र त्यांच्यावर बंधनकारक नसल्याचे घोषित करून मिळण्याकरीता दावा दाखल केल्यानंतर मूळ प्रतिवादी क्र.६ व ८ यांचे विरुध्द प्रस्तुतचा दावा विना कैफियत एकतर्फी चालविण्यात आला असताना मूळ प्रतिवादी क्र.६ व ८ यांनी दि.१८.०२.२०२६ रोजी म्हणजेच उशिराने हजर होऊन सदर विना कैफियत एकतर्फी आदेश रद्द करून आपली कैफियत व प्रतिदावा सादर केला. तसेच नि.६५ वरील तुर्तातूर्त ताकिद मिळणे करीताचा अर्ज सादर केला. मूळ वादी यांनी मागील वर्षी नि.२१ वरील आदेशाप्रमाणे तुर्तातूर्त ताकिदीचा आदेश मिळवलेला असताना मूळ प्रतिवादी यांनी तो आव्हानीत न करता मूळ वादी यांनी यावर्षीच्या शिमगोत्सवाकरीता हरकत अडथळा करू नये म्हणून नि.५४ वर तुर्तातूर्त ताकिदीचा अर्ज दाखल केल्यानंतर मूळ प्रतिवादी क्र.६ व ८ यांनी त्यांचा नि.६५ वरील अर्ज सादर केलेला आहे. यावरून सोयीचा समतोल हा मूळ वादीच्याच बाजूने आहे. तो प्रतिवादी क्र.६ व ८ यांच्या बाजूने नाही हे स्पष्ट होते. सबब, मी मुद्दा क्र.२ चे निष्कर्ष होकारार्थी व मुद्दा क्र. ५ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे.

## मुद्दा क्र. ३ व ६ करिता–

**१४.** मुद्दा क्र.१, २, ४ व ५ चे निष्कर्ष विचारात घेता मूळ वादी यांचा नि.५४ वरील अर्ज नामंजूर केल्यास मूळ वादी यांचे न भरुन येणारे नुकसान होणारे आहे ही बाब मूळ वादींनी प्रथमदर्शनी सिध्द केली आहे. याउलट नि.६५ वरील अर्ज नामंजूर केल्यास मूळ प्रतिवादी क्र.६ व ८ यांचे न भरून येणारे नुकसान होणारे आहे ही बाब मूळ प्रतिवादी क्र.६ व ८ यांनी प्रथमदर्शनी सिध्द केलेली नाही. कारण, मूळ वादी यांच्या बाजूने पारित करण्यात आलेला सन २०२५ शिमगोत्सवाबाबतचा तुर्तातूर्त मनाई हुकूम आदेश त्यांनी कधीही आव्हानीत केल्याचे दिसून येत नाही व त्यांनी सदर दाव्यात देखील उशिराने हजर होऊन आपली लेखी कैफियत व प्रतिदावा सादर केला आहे. मूळ वादी यांनी नि.५४ वर यावर्षीच्या शिमगोत्सवाकरीता तुर्तातूर्त मनाई हुकूमाचा अर्ज दाखल केल्यानंतर मूळ प्रतिवादी क्र.६ व ८ यांनी नि.६५ वर तुर्तातूर्त ताकिद मिळणेकरीता अर्ज दाखल केला आहे. मूळ वादीचा अर्ज नि.५४ नामंजूर केल्यास मूळ प्रतिवादी यांचे दि.०१.०४.२०२४ रोजीचे सत्यप्रतिज्ञापत्रास मंजुरी दिल्यासारखेच होईल. परंतू सदर बाब ही पुराव्याअंती स्पष्ट होईल. मूळ वादीचा दावा प्रलंबित असताना मूळ वादीचा नि.५४ वरील अर्ज नामंजूर करून मूळ प्रतिवादी क्र.६ व ८ यांचा नि.६५ वरील अर्ज मंजूर करणे योग्य व न्यायोचित होणार नाही. प्रस्तुत प्रकरणातील नि.१९ प्रमाणेच नि.५४ वर देखील आदेश पारित करणे योग्य होईल असे मला वाटते. या सर्व बाबी विचारात घेता प्रथमदर्शनी केस ही वादीच्या बाजूने असल्याचे, सोयीचा समतोल हा वादीच्या बाजूचा असल्याने व तुर्तातूर्त मनाई हुकूम अर्ज नि.५४ हा मंजूर केल्यास मूळ वादीचे नुकसान होत असल्याने मी मुद्दा क्र.३ चा निष्कर्ष होकारार्थी व मुद्दा क्र.६ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.७ करीता खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आ दे श

१. अर्ज निशाणी ५४ मंजूर करण्यात येतो.

२. मूळ प्रतिवादी क्र. १ ते ८ यांनी मूळ वादी यांना मौजे. चाटव, ता. खेड, जि. रत्नागिरी येथील श्रीदेवी वाघजाई व नवलाई देवस्थानचा दि.०१.०३.२०२६ पासुन सुरू होणारा सन २०२६ चा शिमगोत्सव साजरा करण्याकरीता कोणतीही हरकत अथवा अडथळा करू नये असा तुर्तातुर्त मनाई आदेश देण्यात येतो.

३. अर्ज निशाणी ६५ नामंजूर करण्यात येतो.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात येतो.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by MHASKE DADA GOPINATH
Date: 2026.02.27 17:59:27 +0530

**दि. २७/०२/२०२६**

**(डी. जी. म्हस्के)**
**२ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**
**खेड, ता. खेड, जि. रत्नागिरी**

CERTIFICATE

| | | |
|---|---|---|
| Order Below Exh.54 & 65 in Case No. | : | R.C.S. No. 67/2024 |
| I affirm that the contents of this pdf file order are same word as per original order. | | |
| Name of Clerk | : | Shri. J. D. Ambekar |
| Court Name | : | 2nd Jt. CJJD & JMFC, Khed |
| Date of Decision | : | 27/02/2026 |
| Order signed by Presiding Officer on | : | 27/02/2026 |
| Order uploaded on | : | 27/02/2026 |